RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ६८(२)] सोमवार, जून १६, २०२५/ज्येष्ठ २६, शके १९४७ [पृष्ठे २२ , किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २२२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून, २०२५.

### अधिसूचना

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.**

क्रमांक बीएनएसएस-०३२५/प्र.क्र.३३/विशा-९.—भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) याच्या कलम ६४ च्या पोट-कलम (१), कलम १७६ च्या पोट-कलम (२), कलम १७९ च्या पोट-कलम (२), कलम १९३ च्या पोट-कलम (३), कलम १९५ च्या पोट-कलम (१), कलम २८६, कलम ३३० च्या पोट-कलम (२), कलम ४६१ च्या पोट-कलम (२), कलम ४९७ च्या पोट-कलम (२), यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :-

१. **संक्षिप्त नाव.**— या नियमांस, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (अभिलेखांचे जतन) महाराष्ट्र नियम, २०२५ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) “नमुना” याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे;

(ख) “संहिता” याचा अर्थ, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, असा आहे;

(ग) “कलम” याचा अर्थ, संहितेचे कलम, असा आहे.

(२) यामध्ये वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) आणि भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ (२०२३ चा ४७) यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच अर्थ असतील.

३. **समन्स.**—संहितेच्या कलम ६४ च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदवावयाच्या समन्स बजावण्याशी संबंधित माहितीचा सारांश पोलीस ठाण्याद्वारे **‘नमुना-अ’** मध्ये नोंदविण्यात येईल.

**४. खबऱ्यास सूचित करण्याची प्रक्रिया.**—(एक) पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी, संहितेच्या कलम १७६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) व खंड (ख) अन्वये मिळालेल्या माहितीचे पूर्णपणे पालन न करण्याची कारणे आपल्या दैनंदिन अहवालात नमूद करील. असा अहवाल ठाण्याच्या दैनंदिन अहवालात समाविष्ट करण्यात येईल. या संदर्भात ठाणे दैनंदिनीमध्ये केलेल्या नोंदीसह हा अहवाल दर पंधरा दिवसांनी पोलीस ठाण्याच्या अधिकारितेचे निरीक्षण करणाऱ्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(दोन) संहितेच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) नुसार प्रभारी अधिकारी, संहितेच्या कलम १७६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खाली येणाऱ्या प्रकरणांबाबतीत, त्यासारखीच कारणे विनाविलंब प्रत्यक्ष, किंवा दूरध्वनी, एसएमएस, व्हॉट्सॲप, ईमेल, इत्यादि सारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे खबऱ्यास सूचित करील.

**५. साक्षीदारांवरील खर्चाचे प्रदान.**—(एक) तपास करणारा पोलीस अधिकारी, संहितेच्या कलम १७९ चे पोट-कलम (१) अन्वये उपस्थित राहणाऱ्या प्रत्येकाच्या माफक खर्चाचे प्रदान, उपखंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराप्रमाणे, त्याच्या निवासाव्यातिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी करील आणि **'नमुना-ब'** मध्ये उपस्थितीचे प्रमाणपत्र निर्गमित करील व **'नमुना-क'** मध्ये नोंदवही जतन करील.

(दोन) यामध्ये दिल्याप्रमाणे साक्षीदारांच्या प्रवास खर्चाचे प्रदान करण्यात येईल :-

(क) रस्ते किंवा रेल्वे किंवा इतर मार्गाने प्रवास असेल तेव्हा बस तिकीट भाडे किंवा रेल्वेचे सामान्य वर्ग तिकीट भाडे यांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च यांपैकी जो कमी असेल तो मिळण्यास तो हक्कदार असेल.

(ख) साक्षीदारास दोनशे रुपये प्रतिदिन याप्रमाणे दैनिक भत्ता प्रदान करण्यात येईल.

**६. तपास पूर्ण झाल्यावर पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल.**—

(एक) चौकशी पूर्ण होताच, पोलीस ठाण्याचा अंमलदार पोलीस अहवालावर गुन्ह्याची दखल घेण्यासाठी अधिकार प्रदान केलेल्या दंडाधिकाऱ्यास इलेक्ट्रॉनिक दळणवळण यंत्रणेमार्फत माहितीचा सारांश पुढे पाठवील.

(दोन) उक्त संहितेच्या कलम १९३ चे पोट-कलम (३) खालील माहितीचा सारांश **'नमुना-ड'** मध्ये सादर केला जाईल.

(तीन) अधिकृत ई-मेल (पोचपावतीसह), एसएमएस किंवा व्हॉट्सॲप (अधिकृत भ्रमणध्वनीवरून), डाकपत्र (प्राधान्याने नोंदणीकृत पत्त्यावर) किंवा एसएमएसच्या पाठपुराव्यासह फोन कॉल लॉग (अधिकृत भ्रमणध्वनीवरून) या माध्यमातून अपराध घडल्यासंबंधीची माहिती ज्याने प्रथम दिली आहे अशा अधिकारी व्यक्तीस त्याने तपासात केलेल्या कारवाईची माहिती कळवेल.

**७. संमतिपत्राचा नमुना.**— (एक) संहितेच्या कलम १९५ च्या पोट-कलम (झ) अन्वये, जर पंधरा वर्षे वयाखालील किंवा साठ वर्षे वयावरील एखादी पुरुष व्यक्ती किंवा स्त्री किंवा मानसिक अथवा शारीरिकदृष्ट्या निःसमर्थ असलेली व्यक्ती किंवा अति गंभीर स्वरूपाचा आजार असलेल्या व्यक्तीस, अशी व्यक्ती ज्या ठिकाणी राहत असेल त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक केल्यास आणि उक्त संहितेच्या कलम १९४ अन्वये, अशा व्यक्तीची पोलीस ठाण्यात हजर राहू व जबाब देऊ इच्छित असेल तर, तपास अधिकारी संबंधित व्यक्तीकडून **'नमुना-ई'** मध्ये लेखी संमती प्राप्त करण्याच्या शर्तीच्या अधीनतेने अशा व्यक्तीस तसे करण्यास परवानगी देता येईल.

(दोन) उक्त व्यक्तीस चालू असलेल्या चौकशीविषयी प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी पदनिर्देशित केलेल्या तपास अधिकाऱ्याकडे असे संमतिपत्र सुपूर्द करण्यात येईल.

**८. संक्षिप्त न्यायचौकशीधीन अभिलेख.**— संक्षिप्त न्यायचौकशी केलेल्या प्रत्येक प्रकरणामध्ये, दंडाधिकारी, कलम २८६ च्या **'नमुना-फ'** अन्वये माहितीचा सारांश अभिलेखात नमूद करील.

**९. विवक्षित दस्तऐवजांबाबत पुरावा.**— अभियोग पक्ष किंवा आरोपीकडून उक्त संहितेच्या कलम ३३० च्या पोट-कलम (१) अन्वये न्यायालयासमोर सादर केलेल्या कागदपत्रांशी संबंधित माहितीचा सारांश हा उक्त संहितेच्या कलम ३३० च्या पोट-कलम (२) अन्वये **'नमुना-ग'** अनुसार सूचीबध्द केला जाईल.

**१०. वॉरंटची अंमलबजावणी.**— न्यायालयाच्या शिक्षादेशानुसार द्रव्यदंडाचा भरणा न केलेल्या प्रकरणाबाबत, अपराध्याकडून द्रव्यदंडाची वसुली करण्यासाठी उक्त संहितेच्या कलम ४६१ च्या पोट-कलम (१) अन्वये न्यायालयाकडून बजावलेल्या वॉरंटची अंमलबजावणी ही उक्त संहितेच्या कलम ७२ व ८३ अनुसार केली जाईल.

परंतु, अशा कोणत्याही वॉरंटची अंमलबजावणी ही अपराध्याला अटक करून किंवा तुरुंगात ठेवून केली जाणार नाही.

**११. दंडाची वसुली.—** संहितेच्या कलम ४६१ च्या पोट-कलम (१) चा खंड (क) अन्वये, दंडाच्या वसुलीबाबत, जिल्हाधिकारी सदर रक्कम ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदीनुसार जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करतील आणि अशा वॉरंटच्या अंमलबजावणीसाठी जप्त केलेल्या कोणत्याही मालमत्तेबाबत अपराधीव्यतिरिक्त अन्य व्यक्तीने केलेल्या कोणत्याही दाव्यांची संक्षिप्तरित्या निश्चित करतील.

**१२. मालमत्तेचे विवरणपत्र .—** (एक) संहितेच्या कलम ४९७ च्या पोट-कलम (१) अन्वये मालमत्ता सादर केल्यापासून चौदा दिवसांच्या कालावधीमध्ये, न्यायालय किंवा दंडाधिकारी अशा मालमत्तेचे वर्णन असलेले विवरणपत्र **'नमुना–ह'** अन्वये तयार करतील.

(दोन) न्यायालय किंवा दंडाधिकारी हे संहितेच्या कलम ४९७ च्या पोट-कलम (२) अन्वये तयार केलेल्या वस्तूसूची अथवा वर्णनाच्या अचूकपणाबाबत **'नमुना-ह'** मध्ये प्रमाणित करतील. भ्रमणध्वनी किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे घेण्यात आलेली छायाचित्रे आणि / किंवा व्हिडिओग्राफी यांबाबतीत देखील दंडाधिकारी त्याच्या अचूकपणाची सत्यता प्रमाणित करतील.

(तीन) अन्य कोणत्याही संविधी आणि / किंवा नियमांन्वये शासित प्रकरणे, जिथे मालमत्ता बंधमुक्त करण्यासाठी प्रक्रिया आणि नमुना अगोदरच निर्धारित करण्यात आले आहे, अशा परिस्थितीत अशा प्रकरणांना **'नमुना-ह'** लागू होणार नाही.

(चार) अन्य कोणत्याही संविधी आणि/किंवा नियमांन्वये मालमत्ता बंधमुक्त करण्यासाठी प्रक्रिया विहित नसेल, अशा प्रकरणांबाबत **'नमुना-ह'** लागू असेल.

**नमु नाअ**

(नियम ३ पहा)

**सं हिते च्या कलम ६४ (१) अन्वये समन्स प्रक्रिया नोंदवही**

**(पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याद्वारे नोंदवावयाचे )**

जिल्हा/आयु क्तालय :- तालु का:- पोलीस्ठाणे :- न्यायालय क्रमां क:-

| अनुक्रमांक | समन्स काढणा-ऱ्या न्यायाल-याचे नाव | समन्स काढ-ल्याचा क्रमां क व दिनां क | पोलीस ठाण्यामार्फ त समन्स प्राप्त झाल्याचा दिनां क व वे ळ | ज्याला समन्स काढले आहे त्या व्यक्तीचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमां क व ईमे ल आयडी | समन्स निष्पादित करणाऱ्या व्यक्तीचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमां क | समन्स इले क्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पोहोचविण्यात आले ले अस-ल्यास त्याचा तपशील<br>अ) एसएमएस<br>ब) व्हॉट्सअॅप<br>क) ईमे ल<br>ड) इतर कोणते ही माध्यम | सु नावणीची तारीख | समन्स निष्पा-दित के ल्याचा दिनां क व वे ळ | समन्स निष्पादित न के ल्याचे कारण | समन्स निष्पादन - सं बं धीचा अहवाल न्यायालयाला सादर के ला तो दिनां क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**नमुना ब**

[नियम ५ (१) पहा]

**उपस्थिती व भत्ता वितरण प्रमाणपत्र**

**(संहितेचे कलम १७९ (२) पहा)**

**(अन्वेषण अधिकाऱ्याने नोंदवावयाचे )**

१. उपस्थित राहिलेल्या व्यक्तीचे नाव : -

२. पत्ता :-

३. उपस्थित राहिल्याचा दिनांक :-

४. उपस्थित राहण्याचे प्रयोजन :-

५. प्रवासाचे साधन :- (बस/रेल्वे /(सर्व साधारण डबा)/ कोणतेही इतर साधन)

६. तिकीट सादर केले आहे :- होय / नाही (सादर केले असल्यास प्रत जोडावी)

७. प्रवास भत्त्याची प्रदान केलेली रक्कम :-

८. प्रदान केलेला दैनिक भत्ता (रु.२०० प्रतिदिन) :- एकूण दिवस________

९. एकूण वितरित केलेली रक्कम : रुपये __________

१०. उपस्थित राहिलेल्या व्यक्तीस पोचपावती :-

मी याद्वारे , उपरोक्त पोलीस ठाण्यामध्ये नमूद तारखेस (तारखांना) उपस्थित राहिलो असून, मला वर नमूद केल्याप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता प्राप्त झाला असल्याचे अभिस्वीकृत करतो.

उपस्थित असलेल्या व्यक्तीची सही :

नाव :-

दिनांक:

अन्वेषण अधिकाऱ्याद्वारेप्रमाणित : असे प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केलेली व्यक्ती तपासासंबंधाने व उपस्थित राहिली असून शर्तीप्रमाणे भत्ता प्रदान करण्यात आलेला आहे .

अन्वेषण अधिकाऱ्याचे नाव :-

दर्जा व बक्कल क्रमांक:-

सही :-

दिनांक :- पोलीस ठाण्याचा शिक्का

**नमु नाक**

[नियम ५ (१) पहा]

**उपस्थिती व भत्ता वितरण प्रमाणपत्र**

**(सं हिते चे कलम १७९ (२) पहा)**

**(तपास अधिकाऱ्याने नोंदवावयाचे )**

| अनु क्रमांक | प्रकरण क्रमांक | अन्वेषण अधिकाऱ्याचे नाव | उपस्थित राहणाऱ्या व्यक्तीचे नाव | व्यक्तीचा निवासी पत्ता | पोलीस ठाण्यातील उपस्थितीचा दिनांक | व्यक्ती तक्रारदार आहे / तक्रारदार नाही / साक्षीदार आहे | दिलेले प्रवास भाडे (बस/ रेल्वे/ दोन्हींपैकी किमान रुपयांमध्ये) | दिलेला दैनिक भत्ता रुपयांमध्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

**नमु नाड**

[नियम ६ (दोन) पहा]

**अन्वे षणाची प्रगतीकळविण्यासाठी पत्र**

**[सं हिते चे कलम १९३ (३) (दोन) (तीन) पहा]**

**(अन्वे षण अधिकाऱ्याने नोंदवावयाचे )**

दिनां क : दिवस/महिना/वर्ष

प्रति,

[खबऱ्याचे नाव/पहिला खबरी/पिडीत]

[पत्ता/ईमे ल/भ्रमणध्वनी क्रमां क.]

विषय: तपास अन्वे षणाच्या प्रगतीसं बंधीसू चना/परिणाम — प्रथम माहिती अहवाल क्रमां क [ ___ / वर्ष ]

महोदय/महोदया,

आपणास सू चित करण्यात ये ते की, [पोलीसठाण्याचे नाव] ये थे नोंदवले ला प्रथम माहिती अहवाल क्रमां क [ ___ / वर्ष ] याचा तपास सध्या [प्रगतीपथावर आहे /पू र्ण झाला आहे]. आतापर्यं त, प्रकरण पु ढील टप्प्यापर्यं त पोहोचले आहे :

[ के ले ल्या कार्य वाहीचा सारां श, जसेकी,अटक, प्राप्त पु रावे , सादर अं तिम अहवाल, दाखल दोषारोपपत्र, इत्यादी.]

अधिक तपशील किंवा विचारणा करण्यासाठी अन्वे षण अधिकाऱ्यास सं पर्क साधू शकाल

अन्वे षण अधिकाऱ्याचे नाव -

पद -

सं पर्क क्रमां क -

(पोलीस ठाणे अधिकाऱ्याची सही)

(पोलीस ठाणे अधिकाऱ्याचे नाव)

(पोलीस ठाणे नाव)

(अधिकृ त भ्रमणध्वनी क्रमां क)

(अधिकृ त ईमे ल आयडी)

पोलीस ठाण्याचा शिक्का

**नमुना नमुई**

[नियम ६ (दोन) पहा]

**संमती अर्ज**

**[संहितेचे कलम १९५ (१) पहा]**

१. नाव :

वय/जन्मतारीख :

लिंग :

पत्ता:

संपर्क क्रमांक :

**२. संरक्षित प्रवर्ग (✓):**

पंधरा वर्षांखालील व्यक्ती :

साठ वर्षांवरील व्यक्ती :

महिला :

मनोविकल :

शारीरिक नि:समर्थता :

गंभीर आजार :

**३. चौकशीबाबत माहिती :**

पोलीस ठाणे :

प्रभारी अधिकारी :

अन्वेषण अधिकारी :

चौकशीचा विषय :

प्रकरण / प्राथमिक माहिती अहवाल क्रमांक :

**४. उपस्थित राहण्याची संमती:**

मी पोलीस ठाण्यात स्वेच्छेने उपस्थित राहण्यास सहमती देत आहे/देत नाही.

मागे पहा.

दिनांक :

वेळ :

ही संमती मी कोणत्याही सक्तीशिवाय स्वेच्छेने दिली आहे.

**५. सही :**

सही / अंगठा :

दिनांक :

वेळ:

**६. पालक (लागू असल्यास):**

नाव : नाते :

सही : संपर्क :

**७. पोलीस अधिकाऱ्याचे प्रमाणन :**

व्यक्तीस त्यांचे कायदेशीर हक्क समजावून सांगितले आहेत. सदर कायदेशीर हक्क यांची माहिती असतानासुद्धा स्वेच्छेने संमती दिलेली आहे.

नाव व पद :

सही :

दिनांक :

कार्यालयीन शिक्का :

## नमुना फ

(नियम ८ पहा)

## संहितेच्या कलम २८६ अन्वये न्यायचौकशीची संक्षिप्तपणे नोंद

## (दंडाधिकारी न्यायालयाने नोंदवावयाचे)

जिल्हा :- तालुका:- न्यायालय क्रमांक:- दंडाधिकाऱ्याचे नाव:-

| खटल्याचा अनुक्रमांक | अपराध घडल्याचा दिनांक | अहवाल दिल्याचा किंवा तक्रार दिल्याचा दिनांक | तक्रारदाराचे नाव (असल्यास) | आरोपीचे नाव, आईवडीलांची संपूर्ण माहिती व निवासी पत्ता | तक्रार केलेला अपराध आणि सिद्ध झालेला अपराध, आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २८३ च्या पोट-कलम (१)च्या खंड (एक), खंड (दोन) किंवा खंड (तीन) अन्वये अपराध घडला त्या संदर्भातील संपत्तीचे मूल्य | आरोपीची याचिका आणि त्याची तपासणी (असल्यास) | निष्कर्ष | शिक्षा किंवा इतर अंतिम आदेश | कार्यवाही संपुष्टात आली तो दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

**नमुना ग**

(नियम ९ पहा)

**____________ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी/सत्र न्यायाधीशांचे न्यायालय**

**(अभियोग/आरोपी पक्षाद्वारे न्यायालयात सादर)**

खटला क्रमांक :-

फिर्यादी

विरुद्ध

आरोपी

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३३० (१) अन्वये न्यायालय/दंडाधिकारी यांच्यासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांची यादी.**

पुढे नमूद केल्याप्रमाणे अभियोग / आरोपी पक्ष त्याच्या खटल्याच्या पुष्ट्यर्थ असलेली विवक्षित कागदपत्रे दाखल करीत आहोत. बचाव पक्षाला याद्वारे, कागदपत्रे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक कागदपत्राची यथार्थता स्वीकारण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी फर्माविण्यात येत आहे. कोणत्याही कागदपत्राची यथार्थता जर विवादित नसेल तर असे कागदपत्र कोणतीही चौकशी, न्यायचौकशी किंवा इतर कार्यवाहीमध्ये पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येतील.

| अनु क्रमांक | कागदपत्रांचा तपशील / वर्णन / ईलेक्ट्रॉनिक आणि डिजीटल अभिलेख | कागदपत्रे / ईलेक्ट्रॉनिक अणि डिजिटल अभिलेखांचा दिनांक | ईलेक्ट्रॉनिक अणि डिजिटल अभिलेखांच्या कागद-पत्रांच्या पृष्ठांची संख्या / हॅश व्हॅल्यू / केबी / एमबी / जीबी / टीबी मध्ये आकार | दाखल केलेली कागदपत्रे ही मूळ/प्रमाणित प्रत/छायाचित्र प्रत आहेत किंवा नाहीत ? | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

दिनांक:-

ठिकाण:-

अभियोग / आरोपी पक्षाची स्वाक्षरी

**नमु नाह**

(नियम ९ पहा)

**[सं हिते च्या कलम ४९७ (२) अन्वये सं पत्तीचे विवरण]**

**(न्यायालयाने / दं डाधिकारी न्यायालयाने नोंदवावयाचे )**

**जिल्हा/आयु क्तालय :-** **तालु का/गाव:-** **पोलीस ठाण्याचे नाव:-**

**सत्र न्यायालय/दं डाधिकारी न्यायालय क्रमां क :-**

| अनु क्रमां क | प्राथमिक माहिती अहवाल क्रमां क/ प्रकरण क्रमां क | सं पत्तीचे स्वरूप व वर्ण न (नाशवं त / शाश्वत ) | सं पत्तीचे प्रमाण (सं ख्या/ वजन/ आकार / इतर कोणते ही मोजमाप इत्यादी ) | भारतीय नागरिक सु रक्षा सं हिते च्या कलम ४९७ (३) नु सार दं डाधिकाऱ्याने / न्यायालयाने सं पत्तीची / वस्तू ची छायाचित्रे / चित्रीकरण के ले आहे किंवा नाही | जप्तीच्या दिनां कावे ळी सं पत्तीचे मू ल्य ? | सं पत्तीविषयी इतर कोणतीही सं बं धित माहिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ.जयंत सरोदे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

dated 16th June, 2025.

*NOTIFICATION*

BHARATIYA NAGARIK SURAKSHA BNSS (MAINTENANCE OF RECORDS) MAHARASHTRA RULES, 2023.

No. Misc-0325/C.R.33/Special-09.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 64, sub-section (*2*) of section 176, sub-section (*2*) of section 179, sub-section (*3*) of section 193, sub-section (*1*) of section 195, section 286, sub-section (*2*) of section 330, sub-section (*2*) of section 461, sub-section (*2*) of section 497 of the Bharatiya Nagarik Suraksha BNSS, 2023 (46 of 2023), read with section 24 of the General Clauses Act, 1897 (10 of 1897) and in supersession of all earlier notifications, rules, orders or instruments issued in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely:-

*1. Short title and commencement.*— (1) These rules may be called the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita (Maintenance of Records) Maharashtra Rules, 2025.

*2. Definitions.* -(1) In these rules, unless the context otherwise requires -

(a) “BNSS” means the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023;

(b) “BNS” means the Bharatiya Nyaya Sanhita, 2023;

(c) “BSA” means the Bhartiya Sakshya Adhiniyam, 2023;

(d)“Court” means sub-section (*5*) of section 2 of BNS and clause (a) of sub-section 1 of section 2 of BSA;

(e) “Court of Session” means section 8 of BNSS;

(f) “Court of Judicial Magistrate” means section 9 of BNSS;

(g) “Documents” means sub-section (*8*) of section 2 of BNS and clause(d) of sub-section 1 of section 2 of BSA;

(h) “Form” means a Form appended to these rules;

(i) “Officer in charge of a police station” means clause (r) of sub-section (*1*) of section 2 of BNSS;

(j) “property” means clause (a) and (b) of sub-section 1 of section 497 of BNSS;

(k) “Section” means a section of the BNSS, BNS, BSA.

(2) Words and expressions used but not defined in these rules shall have the same meanings as are respectively assigned to them under the BNSS, BNS, BSA and General Clauses Act,1897.

*3.* The substance of information relating to the service of summons to be recorded under section 64(1) of the BNSS shall be record in a register in **‘Form-A’** by the police station.

*4.* The officer in charge of a police station shall record the reasons for not fully complying with the information received under clauses (a) and (b) of sub-section (*1*) of section 176 of the BNSS in its daily diary report. Such a report shall be included in the station diary. This report along with entries made in station diary this regard shall be forwarded fortnightly to the Magistrate overseeing the jurisdiction of the police station. In the cases falling under clause (b) of sub-section (*1*) of section 176 of the BNSS, the officer in charge as per sub-section (*2*) of section 176 of BNSS, shall immediately without delay notify the informant of the reason for the same either through physical mode, or through electronic mode like telephone, SMS, WhatsApp, e-mail etc.

*5.* Any police officer making an investigation, by order in writing, require the attendance before himself of any person being within the limits of his own or any adjoining station who, from the information given or otherwise, appears to be acquainted with the facts and circumstances of

the case; and such person shall attend as so required is entitle to receive the reasonable expenses of every person, attending under sub-section (*1*) of section 179 at any place other than his residence. To receive such expenses under sub-section (*2*) of section 179, the Investigating officer should issue a certificate for the same in format **'Form- B'** and also maintain a register at his end in the format **'Form-C'** for disbursement of allowances. These expenses include traveling expenses equal to ST bus ticket or the fare of the railway general class ticket or in case any other mode of transportation is taken by the person from their residence to the police station then he is entitled for equivalent traveling expenses of either ST bus ticket or railway general class ticket whichever is less and the daily allowance of Rs.200/- per day for food and other incidental expenses.

*6.* As soon as the investigation is completed, the officer in charge of the police station shall forward the substance of information, including through electronic communication to a Magistrate empowered to take cognizance of the offence on a police report. The substance of the report submitted under sub-section (*3*) of section 193 of the BNSS shall be submitted in the form of **'Form-D'**. The officer shall communicate the progress of the investigation either by way of using official e-mail (with delivery acknowledgment receipt), SMS/WhatsApp (through official mobile), postal letter (preferably Registered address), or through phone call log followed by SMS (through official mobile) provide the action taken by him, to the person, if any, by whom the information relating to the commission of the offence was first given.

*7.* Under sub-section (*1*) of section 195 BNSS, if any male person under the age of fifteen years or above the age of sixty years or a woman or a mentally or physically disabled person or a person with acute illness shall be required to attend at any place other than the place where such person resides and if such person is willing to attend and answer at the police station under section 194, such person may be permitted so to do, subject to condition that the Investigating officer shall obtain a written consent from the concerned person in format 'Form-E'. This consent letter shall be handed over to the Investigating officer designated to physically inform the said person about the ongoing inquiry.

*8.* The substance of information under section 286 of BNSS, in every summary trial case, the Magistrate shall enter the record of summery trial in **'Form-F'**.

*9.* The substance of information relating to the documents submitted under sub-section (*1*) of section 330 of the BNSS before court either prosecution or accused, shall be listed under sub-section (*2*) of section 330 of the BNSS in the format of **'Form G'**.

*10.* The warrant issued under clause (a) of sub-section (*1*) of section 461 of BNSS by the court for recovery of fine from the offender, in case of the non-payment of fine as sentenced by the court, shall be executed as laid down under section 72 to section 83 of BNSS provided that, no such warrant shall be executed by the arrest or detention in prison of the offender.

*11.* In case of recovery of fine under clause (a) of sub-section (*1*) of section 461 of BNSS, the Collector as prescribe under Maharashtra Land Revenue Code,1966 shall summarily determine any claims made by any person other than the offender in respect of any property attached in execution of such warrant.

*12.* The Court or the Magistrate shall, within a period of fourteen days from the production of the property under sub-section (*1*) of section 497 of BNSS before it, prepare a statement of such property containing its description in the format of **'Form-H'**. The Court or the Magistrate shall certify the correctness of the inventory/ description so prepared under sub-section (*2*) of section 497 taken in format **'Form-H'**. In case of photographs and/or videograph taken on mobile phone or any electronic media, the Magistrate shall also certify the correctness of the same to be true. The cases governed under any special statutes and/or rules, where the procedure and format has already been laid down for release of property, in such a situation the 'Form-H' shall not be applicable to those cases. In case of non-prescribed procedure and format for release of property under any special statute and/or rule 'Form-H' shall be applicable.

**FORM-A**

*(see rule 3)*

**Summons Process Register u/s 64(1) of the Sanhita**

**(To be recorded by the In-charge of the Police Station)**

District/Commissionerate:- Taluka:- Police Station:- Court No:-

| Sr. No. | Name of the Court issuing summons | No. & date of issuance of summons | Date & time when the summons received by the police station | Name, address, mobile no. and e-mail id of the person to whom summon is issued | Name, address and mobile no. of the person who executed the summon | Details of the mode if Summon is executed by an electronic means<br>a) SMS<br>b) Whatsapp<br>c) Email<br>d) Any other | Date of hearing | Date & time of execution of Summon | Reason if summon not executed | Date of submission of report about execution of summons to the court |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |

**FORM -B**

[see rule 5 (1)]

**Certificate of Appearance and Allowance Disbursement**

**[See Section 179(2) of the Sanhita]**

**(To be recorded by Investigating Officer)**

1. Name of the Person Appeared: -

2. Address :-

3. Date(s) of Appearance :-

4. Purpose of Appearance :-

5. Mode of Transport used : - (Bus/Railway (General Compartment)/Any other mode)

6. Ticket Submitted : Yes/No (If yes attached copy)

7. Travel Allowances Amount Paid : -

8. Daily Allowance Paid (Rs.200 per day) :- Number of Days ______.

9. Total Amount Disbursed: Rs._________

10. Acknowledgement by person Appeared :-

I hereby acknowledge that I hereby appeared at the above-mentioned police station on the date(s) noted and have received the travel allowance and daily allowance as mentioned above.

Signature of the person Appeared:

Name :-

Date :

Certified by Investigating Officer: It is certified that the above-mentioned person appeared in connection with investigation and the allowance has been disbursed as per the norms.

Name of the Investigation Officer : -

Rank and Buckle No : -

Signature : -

Date :-

of the Police Station
Seal

**FORM-C**

[see rule 5 (1)]

**Register of Appearance and Allowance Disbursement**

**[See Section 179(2) of the Sanhita]**

**(To be recorded by Investigating Officer)**

| Sr.No | Cr. No. | Name of the Investigating Officer | Name of Person appearing | Residential Address of person | Date of appearance at Police Station | Whether the person is complainant/non-complainant/witness | Fare provided (Bus/ Railway/Minimum of two in Rs) | Daily Allowance Provided in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |

**FORM-D**

[see rule 6 (ii)]

**Letter to Communicate Investigation Progress**

**[See section 193*(3)(ii)(iii)* the Sanhita]**

**(To be recorded by Investigating Officer)**

Date: [DD/MM/YYYY)

To.

[Name of Informant/First Informant/Victim]
[Address/E-mail/Mobile No.]

Subject: Intimation regarding investigation progress result-Case FIR No. [XXX/Year]

Sir/Madam,

This is to inform you that the investigation in FIR No. [XXX. Year] registered at [Police Station Name) is currently [in progress/completed). As of now, the following stage has been reached in the case:

[Summary of action taken, such as arrest made, evidence collected, final report submitted, charge sheet filed, etc.]

For further details or queries, you may contact to Investigating Officer:

IO Name -

Designation -

Contact Number -

(SHO Signature)

(SHO Name)

(Police Station Name)

(Official Mobile Number)

(Official e-mail id)

Seal of the Police Station

**FORM-E**

[see rule 6 (ii)]

**Consent Application**

*See Section 195(1) the Sanhita*

Name / नाव:

Age / DOB/वय/जन्मतारीखः

Gender / लिं ग

Address / पत्ताः

Contact No. / सं पर्कक्रमां कः

2. Protected Category (√) / सं रक्षितप्रवर्ग (√):

Below 15 yrs / १५ वर्षा खालीलव्यक्ती:

Above 50 yrs/६० वर्षा वरीलव्यक्ती:

Woman/महीला :

Mentally Disabled / मनोविकल:

Physically Disabled / शारीरिक दिव्यां ग:

Acutely III / गं भीरआजार:

3. Inquiry Details / चौकशीबाबत माहितीः

Police Station / पोलीस ठाणे:

Officer in-Charge / प्रभारी अधिकारीः

Investigating Officer/ सं पासीअधिकारी:

चौकशीचा विषयः

Case/FIR No. / प्रकरण / एफआयआर क्रमां कः

4. Consent to Attend / उपस्थित राहण्याची सं मतीः

I voluntarily agree to appear at the police station as below. / मी पोलीस ठाण्यात स्वे च्छे नेउपस्थित राहण्यात सहमती दे तआहे.

Date / दिनां क

Time /वे ळ

I declare that, this consent is free and without coercion. / ही सं मतीमी कोणत्याही सक्तीशिवाय स्वे च्छे ने दिली आहे.

5. Signature / सहीः

Signature/Thumb / सही/अं गठाः P.T.O.

Date / दिनां क

Time /वे ळ

6. Guardian (if applicable) पालक (लागू असल्यास) :

Name / नाव: Relation नाते :

Signature / सही: FORM Contact / सं पर्क

7. Officer Certification / पोलीस अधिकाऱ्याचे प्रमाणिकरणः

The person has informed about his Legal Rights. Despite having knowledge of the Legal Rights, voluntary consent is given. / व्यक्तीस त्यां चेकायदे शीरहक्क समजावून सां गितलेआहे त सदर कायदे शीरहक्क यां चीमाहिती असतानासुद्‌धा स्वे च्छे नेसं मतीदिले लेआहे.

Name & Rank / नाव व पदः

Signature / सही:

Official Stamp / शासकीय शिक्काः Date / दिनां क

**FORM-F**

*see rule 8*

**Record in Summary Trial u/s 286 of the Sanhita**

**(To be recorded by Magistrate Court)**

District: - Taluka: - Court No.: - Magistrate Name: -

| Serial no. of the case | Date of the commission of the offence | Date of the report or Complaint | Name of the complainant (if any) | Name, Parentage and Residence of the accused | Offence complained of and the offence (if any) proved, and in cases coming under clause (i), clause (ii) or clause (iii) of sub-section (*1*) of section 283 of BNSS, the value of the property in respect of which the offence has been committed | Plea of the accused and his examination (if any) | Finding | Sentence or other final order | Date on which proceedings terminated |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

**FORM-G**

*see rule 9*

**IN THE COURT OF JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS/SESSIONS JUDGE,**

**AT----------------**

(Submitted by Prosecution/Accused to the Court)

CASE NO:-

Complainant

*V/s*

Accused

List of documents filed before Court/Magistrate U/s 330(*1*) of the Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023.

That the prosecution/accused is filing certain documents in support of its case as mentioned below. The defence is hereby called upon to admit or deny the genuineness of each document within period of 30 days from the date of receipt of the documents at their end. If the genuineness of any document is not disputed, then such document may be read in evidence in any inquiry, trial or other proceeding

| Sr. No. | Particulars/ description of the documents/ electronic and digital record | Date of the the documents/ electronic and digital record | Number of Pages of the documents/ hash value/size in KB/MB/GB/TB of the electronic and digital record etc | Whether the filed documents is original/ certified copy/ photo copy | Remarks if any |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

Date:

Place: Signature of Prosecution/Accused

## FORM-H

*see rule 9*

**(Statement of property u/s 497(2) of the Sanhita)**

**(To be recorded by Court/ Magistrate Court)**

District / Commissionerate: - Taluka /Village: - Name of the police station: -

Session Court/Magistrate Court No: -

| Sr. No. | FIR No./Case No. | Description and Nature of property (perishable/non-perishable) | Quantity of property (number/weight/ size /any other measurement etc) | Whether Magistrate /Court has taken the photographs/ videography of the property/article as per section 497(3) of BNSS | Value of the property on the date of seizer? | Any other relevant information about the property | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. JAYANT SARODE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.